अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 13 नोव्हेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 13 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## न.प. निवडणूक : भाजपची सूत्रे विलास विखार यांच्याकडे!

ब्रह्मपुरी/ महेश पिलारे

ब्रह्मपुरी शहराच्या गुलाबी थंडीत नगरपालिकेचे राजकारण तापत चालले आहे. ब्रह्मपुरी नगरपालिकेची निवडणूक येत्या दोन डिसेंबरला होणार आहे. मात्र ब्रह्मपुरीत भारतीय जनता पक्षात नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचे उमेदवार ठरविण्यावरून रणकंदन सुरु आहे. एकीकडे माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी निष्ठावंत कार्यकर्त्यांला नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मिळवण्यासाठी खटाटोप करावा लागत आहे. तर दुसरीकडे काँग्रेस मधून भाजपमध्ये प्रवेश केलेले नवागत माजी नगरसेवक विलास विखार यांचे नाव नगराध्यक्ष पदाचे संभाव्य उमेदवार म्हणून गाजत आहे. नागरिकांच्या चर्चेवरून एकंदरीत भाजपात मोठ्या प्रमाणात अंतर्गत कलह सुरू असून नवप्रवेशिताला नगराध्यक्षाची संधी मिळणार अशी चर्चा जनमानसात जोरकसपणे सुरू आहे.

ब्रह्मपुरी नगरपालिका निवडणूकीचे अर्ज भरण्याची प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. परंतु, अद्यापही ब्रह्मपुरीतील भारतीय जनता पक्षातील अंतर्गत कलहामुळे नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचे उमेदवार कोण? हे ठरविण्यात यश आले नाही. एकीकडे माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा निष्ठावंत भाजप कार्यकर्ता रहावा, यासाठी शर्तीचे प्रयत्न करीत आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. तर दुसरीकडे सहा महिन्यापूर्वीच काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपात प्रवेश केलेले नवागत माजी नगरसेवक विलास विखार हे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी उर्फ कीर्तीकुमार भांगडिया यांनी त्यांचे नाव समोर केले आहे. भाजपात सर्वगुणसंपन्न व आर्थिक दृष्ट्या संपन्न असा एकमेव नगराध्यक्ष पदाचा उमेदवार म्हणून माजी नगरसेवक विलास विखार यांचा बोलबाला असल्याचे कळते. असे जरी असले तरी, नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा निष्ठावंत भाजप कार्यकर्ता असावा तसेच नवप्रवेशित नसावा, अशा ठाम भूमिकेवर देशकर गट अडून आहेत.

शिवाय, माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांचे सुपुत्र यास स्थानिक स्वराज्य संस्थेत पाय रोवायचे असल्यामुळे देशकर गट काँग्रेसला अंतर्गत सहकार्य करीत असल्याची लोकचर्चा सुरू आहे. तसेच माजी नगरसेवक विलास विखार हे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ठरल्यास? आगामी ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी त्यांचे खांद्यावर येईल, ह्या भीतीपोटी माजी आमदार प्रा. अतुल देशकर हे निष्ठावंत कार्यकर्ता असलेल्या आपल्या गटाच्या उमेदवाराला प्रतिनिधित्व मिळण्यासाठी प्रयत्न करीत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. अशाही परिस्थितीत नवप्रवेशित माजी नगरसेवक विलास विखार यांच्यावर पक्षश्रेष्ठीं, महसूल मंत्री तथा आमदार महोदयांचा वरदहस्त असल्यामुळे विलासच्या हातात कमळाचे फुल उगविण्याची चर्चा चौकात चौकात ऐकावयास मिळत आहे.




यासाठी नवप्रवेशित माजी नगरसेवक विलास विखार यांनी आपले सर्वस्व पणाला लावत पक्षश्रेष्ठींकडे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारी करीता मागणी केल्याची कळते. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून ब्रह्मपुरीत भारतीय जनता पक्षाचा विस्तार याबाबतही पक्षश्रेष्ठींचे लक्ष वेधल्याचे बोलले जात आहे. त्यानुसारच ब्रह्मपुरी नगरपालिकेच्या निवडणुकीचे सूत्रे ही पक्षश्रेष्ठीकडून थेट माजी नगरसेवक विलास विखार यांच्याकडे जाणार असल्याचे खात्रीलायक वृत्त राजकीय जाणकारांकडून कळते. ब्रह्मपुरी नगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक पदाचे उमेदवार, निवडणुकीची व्युहरचना आणि पक्षवाढी संदर्भातील भूमिका

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## काँग्रेसकडून नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार म्हणून योगेश मिसार यांच्या नावावर शिक्कामोर्तब

### एकूण २३ पैकी २२ जागांवर उमेदवार जाहीर

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

ब्रम्हपुरी नगर पालिकेची निवडणूक ०२ डिसेंबरला पार पडणार आहे. १० नोव्हेंबर २०२५ पासून उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या निवडणूकीत नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार म्हणून काँग्रेस पक्षाकडून माजी नगरसेवक तथा उद्योजक डॉ. नितीन उराडे व प्रतिष्ठीत व्यापारी



तथा ब्रम्हपुरी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष योगेश मिसार यांच्यात रस्सीखेच सुरू होती. अखेर काँग्रेस पक्षाने नगराध्यक्ष पदाचा निश्चित उमेदवारांचा तिढा सोडविला. काँग्रेस पक्षाकडून ब्रह्मपुरी नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे निश्चित उमेदवार म्हणून प्रतिष्ठीत व्यापारी तथा ब्रम्हपुरी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष योगेश मिसार यांचे नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. ब्रह्मपुरी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# नव्या लुटीचे संकट!

गुन्हेगारीचे स्वरूप काळानुसार बदलत गेले आहे. कधी रस्त्यावर चाकूचा धाक दाखवून पाकिटमारी होत असे, तर आज मोबाईलच्या पडद्यावरून बोट फिरवले तरी लाखो रुपयांची लूट होते. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीने व्यवहार सुलभ केले, पण त्याच वेगाने गुन्हेगारीलाही नवे शस्त्र दिले. सध्या देशभरात 'डिजिटल अटक' किंवा 'डिजिटल अरेस्ट' नावाच्या सायबर गुन्ह्याने थैमान घातले आहे. या नव्या गुन्हेगारी पद्धतीने सर्वसामान्य नागरिकांना अक्षरश: जाळ्यात अडकवून लुटले जात आहे. या गुन्ह्याची पद्धत अतिशय कपटी आहे. सायबर गुन्हेगार स्वत:ला पोलिस, सरकारी अधिकारी किंवा तपास संस्थेचा प्रतिनिधी म्हणून सादर करतात. ते व्हॉट्सअॅप, व्हिडिओ कॉल किंवा फोनद्वारे पीडित व्यक्तीला घाबरवतात. 'तुमच्या नावावर गुन्हा नोंदवला आहे' किंवा 'तुमचे पार्सल ड्रग्ससह सापडले आहे' अशा धमक्या देत ते व्यक्तीला मानसिकदृष्ट्या कोपऱ्यात ढकलतात. सर्वसामान्य नागरिक घाबरलेल्या अवस्थेत स्वत:च आपले बँक तपशील, ओटीपी किंवा व्यवहाराची संमती देतो. म्हणजेच गुन्हेगाराच्या भीतीने व्यक्ती स्वत:च आपल्या पैशांचा गळा घालते आणि हाच 'डिजिटल अटक'चा क्रूर पैलू आहे.

सीबीआयच्या माहितीनुसार, आतापर्यंत तब्बल तीन हजार कोटी रुपयांची लूट या मार्गाने झाली आहे. ही केवळ नोंदलेली आकडेवारी असून, वास्तविक नुकसान यापेक्षा कैकपटीने अधिक असण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयालाही या प्रश्नात हस्तक्षेप करावा लागला, ही बाबच या समस्येच्या गांभीर्याची साक्ष देते. न्यायालयाने तपास संस्थांना सायबर गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार सायबर गुन्ह्यांची संख्या वर्षागणिक प्रचंड वाढत आहे. २०२२ मध्ये ६५,९८३ प्रकरणे नोंदली गेली असताना २०२३ मध्ये ती वाढून ८६,४२० वर पोहोचली, म्हणजे तब्बल ३१ टक्क्यांची वाढ. या आकड्यांनी स्पष्ट केले आहे की डिजिटल गुन्हे आता अपवाद नसून दैनंदिन वास्तव बनले आहेत. या गुन्ह्यांचा शोध घेणे आव्हानात्मक आहे. कारण गुन्हेगारांचा चेहरा नसतो, ठिकाण ठाऊक नसते आणि ते परदेशातूनही काम करू शकतात. कायद्याच्या चौकटी, अधिकारक्षेत्र आणि तांत्रिक मर्यादा तपासात अडथळे निर्माण करतात. त्यातच भीती, लाज किंवा अज्ञानामुळे अनेक बळी तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. परिणामी, गुन्हेगारांचे मनोबल वाढते आणि त्यांची जाळी अधिक विस्तारतात.

यावर उपाय म्हणून केवळ कठोर कायदे पुरेसे ठरणार नाहीत. जनजागृती आणि शिक्षण अत्यावश्यक आहे. नागरिकांनी तंत्रज्ञानाचा वापर करताना सावधानता बाळगणे, अज्ञात फोन कॉल किंवा लिंकवर प्रतिसाद न देणे, सरकारी नावाखाली येणाऱ्या धमक्यांवर विश्वास न ठेवणे आणि त्वरित सायबर हेल्पलाइन १९३० वर तक्रार करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर तपास संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञानाची साधने वापरून या गुन्हेगारांपेक्षा दोन पावले पुढे राहिले पाहिजे. आंतरराष्ट्रीय पातळीवर सायबर गुन्हेगारांविरुद्ध सहकार्य वाढवणेही काळाची गरज आहे. कारण हे गुन्हे राष्ट्रीय सीमांपुरते मर्यादित नाहीत. स्थानिक स्तरावर पीडितांना गोपनीयतेसह तक्रार करण्याचे अधिक पर्याय उपलब्ध करून दिले गेले, तर अधिक लोक पुढे येतील आणि गुन्ह्यांचे प्रमाण कमी होईल. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० या क्षेत्रासाठी पाया घालतो, परंतु त्यात काळानुरूप सुधारणा आवश्यक आहेत. आजचे सायबर गुन्हे अत्यंत जटिल आणि बहुआयामी झाले आहेत. त्यामुळे कायदा, तंत्रज्ञान आणि सामाजिक जागृती या तिन्ही घटकांचा समन्वय साधल्याशिवाय या संकटावर मात करणे अशक्य आहे. डिजिटल युगाने आपल्याला अमर्याद सोयी दिल्या, पण त्याचबरोबर नव्या प्रकारच्या धोक्यांचे दरवाजेही उघडले. 'डिजिटल अटक' हा त्यातला सर्वात भयानक प्रकार आहे. त्यामुळे नागरिकांनीच सावध, सजग आणि जबाबदार राहून या डिजिटल गुन्हेगारांपासून स्वत:चे रक्षण करणे, हीच काळाची गरज आहे.

# महामार्गाच्या कामात मुख्य पाईप लाईन फुटली

## लाखो लिटर पाण्याचा अपव्यय



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथे ब्रम्हपुरी – वडसा मुख्य महामार्गाचे बांधकाम सुरू आहे. रस्त्यालगतच्या तोडलेल्या झाडांचे बुड जेसीबीच्या सहायाने काढत असताना भूती नाल्यावरून पाणी पुरवठा करणारी मुख्य पाईप लाईन फुटली. त्यामुळे लाखो लिटर पाणी वाहून गेले.

येथील ख्रिस्तानंद हॉस्पिटल चौकापासून भूती नाल्यापर्यंत मुख्य महामार्ग क्र. ३५३ डी. चे काम हाती घेण्यात आले आहे. कंत्राटदाराकडून रस्त्याच्या बांधकामात अनियमितता दिसून येत आहे. सुरवातीलाच मशीनच्या सहाय्याने रस्ता खोदल्याने नागरिकांना खड्डे व धुळीचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. खड्डयांमुळे दुचाकी चालकांना आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. या महामार्गालगत सर्व शाळा – महाविद्यालये असल्याने हजारो विद्यार्थ्यांना प्रवास करावा लागतो. याच परिसरात कृषी उत्पन्न बाजार समिती असून रविवारी बैल बाजार तर मंगळवार व शुक्रवारी आठवडी बाजार भरतो. त्यामुळे या परिसरात मोठी वर्दळ असते. अनेकदा वाहतुकीचा खोळंबा निर्माण होत असल्याने नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागतो.

सोमवारी सकाळी रस्त्याच्या बाजूच्या तोडलेल्या झाडांचे बुंधे जेसीबीच्या सहायाने काढत असताना शहरातील पाण्याच्या टाकीला पाणी पुरवठा करणारी मुख्य पाईप लाईन फुटली. त्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी व चिखल निर्माण झाला होता. नगर परिषदेला माहिती मिळताच पाण्याचा पुरवठा बंद करण्यात आला. रस्त्याचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराकडून काम सुरु असताना मुख्य पाईप लाईन फुटली. झालेले नुकसान मोठे आहे. मुख्य पाईप लाईन फुटल्याने ती त्वरित दुरुस्त करावी लागेल. कंत्राटदाराकडून पाईप लाईन पूर्ववत करण्यात येणार असल्याची माहिती न.प. मुख्याधिकारी माधुरी सलामे यांनी दिली.

# आचारसंहितेचा भंग केल्यास कारावास व दंडही

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीत उमेदवारांवर आदर्श आचारसंहितेची टांगती तलवार राहणार आहे. उमेदवारांनी आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास पाच वर्षांची शिक्षा किंवा आर्थिक दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

मत मागण्यासाठी लाच देण्याचे सिद्ध झाल्यास एक वर्षाचा कारावास, शपथपत्रावर खोटी माहिती दिल्यास कलम २१२ नुसार कारवाई, प्रचार करताना सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्यास सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंध अधिनियम १९८४ नुसार कारवाई, यासोबतच निवडणुकीत गैरप्रकार करण्याचा प्रयत्न झाल्यास उमेदवार अपात्र ठरतो. याशिवाय पुढील निवडणुकीतही त्याला अपात्र ठरवले जाऊ शकते.

आचारसंहितेच्या काळात जात, धर्म किंवा भाषा यांचा वापर मतदारांना प्रभावित करण्यासाठी करता येत नाही. त्याआधारावर सभा, संमेलन किंवा अधिवेशन घेता येत नाही. धार्मिक स्थळांवर प्रचार करता येत नाही. मतदारांना प्रलोभन देऊ नये, पैशाचे वाटप करू नये. वित्तीय अनुदान, शासकीय घोषणा, आश्वासन, विविध प्रकल्प, भूमिपूजन, उद्घाटन, अशा कुठल्याही गोष्टी करता येत नाही. सत्ताधारी नेत्यांना सरकारी वाहने वापरता येत नाहीत. सामाजिक उपक्रमांवर मर्यादा येतात. कर्मचाऱ्यांची बदली, नेमणुकीचे आदेश, नियुक्त्या, पुस्तके प्रकाशन इत्यादी प्रकारावर बंधने येतात.

# दुसरी शिक्षक-पालक सभा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

एकात्मता शिक्षण संस्था द्वारा संचालित, हिंदू ज्ञान मंदिर येथे दि. १० नोव्हेंबर २०२५ रोज सोमवार ला २री शिक्षक –पालक सभा संपन्न झाली. या सभेमध्ये प्रथम सत्रान्त परीक्षा, वार्षिक स्नेह संमेलन, क्रिडा सप्ताह तसेच शैक्षणिक सहल या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सोबतच अभ्यासक्रम तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहशालेय उपक्रम राबविण्याकरिता चर्चा करण्यात आली. या सभेला अध्यक्ष मुख्याध्यापिका सय्यद मॅडम, उपाध्यक्ष शिवणकर सर, सचिव श्रीरामे मॅडम तथा सहसचिव जनबंधू मॅडम, शाळेतील शिक्षक –शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. सभेचे संचालन तथा आभार प्रदर्शन शाळेतील शिक्षिका पंडित मॅडम यांनी केले.

## विनोदिनी

एक पालेभाजीपूर्ण वाक्य (अर्थातच पुण्यातील)

शिक्षिका : तु 'माठ आहेस' सारख्या चुका करतोस, उद्या 'पालका'सोबत ये...

विद्यार्थी : 'पडवळ' मॅडम... मला 'गवार' समजू नका.. माझ्या डोक्यात 'बटाटे' भरलेत का... दिसायला 'लिंबू' टिंबू असलो तरी 'कोथिंबीरे' आडनाव आहे माझं... आणि कोणीही 'आलं' गेलं मला 'भुईमुगाच्या' टरफलासारखं फेकू शकत नाही...

ना ''कांदा' ना 'लसून'' आमच्या नादी लागाल तर डायरेक्ट ससून...

# ब्रम्हपुरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी राकेश जाधव चौकशीच्या फेऱ्यात

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी राकेश जाधव यांनी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री गस्तीवर असताना वाळूने भरलेला ट्रक पकडला. त्यानंतर पहाटे तीन वाजता चिमूर पोलीस ठाण्यात आणला. दहा दिवस हा ट्रक बेवारस स्थितीत ठाण्यात होता. ट्रकमालकाशी आर्थिक देवाणघेवाण झाल्यामुळेच गुन्हा दाखल केला नाही अथवा तक्रारही नोंदवली नाही, अशी तक्रार पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांना मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी जाधव यांची अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्यामार्फत चौकशी सुरू करण्यात आली आहे.

चिमूर पोलिसांनी ट्रकमालक धनपाल गभने याची चौकशी केली असता त्याने हा ट्रक भंडारा जिल्ह्यातील सावरला येथील विवेक राजू दोनाडकर याला विकल्याची माहिती दिली. पोलिसांनी दोनाडकर याची चौकशी केली असता हायवा ट्रकचा वापर वाळू तस्करीत केला जात असल्याचे सांगितले.

दोनाडकर याने ट्रक पकडल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी जाधव यांच्याशी आर्थिक व्यवहार केल्याचा जबाब दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळेच जाधव यांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला नाही किंवा फिर्याद, जप्ती, पंचनमा किंवा स्टेशन डायरीत नोंदही केली नाही.

# काँग्रेसची वंचित बहुजन पक्षाशी हातमिळवणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

०२ डिसेंबरला होणाऱ्या ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या निवडणूकीच्या तोंडावर भारतीय काँग्रेस पक्षाने वंचित बहुजन आघाडी हातमिळवणी केली. यासंबंधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडीतील स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये नुकतीच बैठक पार पडली. याबाबत भारतीय काँग्रेस पक्षाने आपली भूमिका व्यक्त करतांना, काँग्रेस हा सर्वजाती धर्मांना सोबत घेऊन चालणारा पक्ष आहे. फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेला माणणारा, पुरोगामी विचारांचा पक्ष असून ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या निवडणूकीत काँग्रेस पक्षाशी समविचारी असलेल्या वंचित बहुजन आघाडी या पक्षाशी आघाडी केरीत असल्याचे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी यांच्यात पार पडलेल्या बैठकीत ०२ डिसेंबरला होणाऱ्या नगर पालिका निवडणूकीत वंचित बहुजन आघाडीला ०३ जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला. यात **प्रभाग क्रमांक ०४** अनुसूचित जाती सर्वसाधारण, **प्रभाग क्रमांक ०६** अनुसूचित जाती महिला, **प्रभाग क्रमांक ०७** अनुसूचित जाती महिला या जागांचा समावेश आहे. सदर माहिती विधीमंडळ पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या पत्रपरिषदेत देण्यात आली.

पत्रपरिषदेला ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष खेमराज तिडके, शहराध्यक्ष हितेंद्र राऊत, सुधाकर पोपटे, पुष्पाकर बांगरे, वंचित बहुजन आघाडीचे डॉ. प्रेमलाल मेश्राम, डी.एम.रामटेके, रतन लांडगे, मिलींद घोरमोडे, नरेंद्र मेश्राम, लिलाधर वंजारी आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315
अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# महा-ई-सेवा केंद्र चालकांचा संपाचा इशारा

## १२ ते १४ नोव्हेंबर दरम्यान ३ दिवस केंद्रे राहणार बंद

ब्रम्हपुरी/का.प्र.

शासनाच्या उदासीन धोरणाविरोधात ब्रम्हपुरी तालुक्यातील महा-ई-सेवा केंद्र तसेच आधार सेवा केंद्र चालकांनी तीन दिवसांच्या संपाचा इशारा दिला आहे. दि. १२ ते १४ नोव्हेंबर या कालावधीत सर्व केंद्रे बंद राहणार आहेत. या निर्णयाबाबत अखिल स्तरीय महा-ई-सेवा व आधार सेवा केंद्र संघटनेतर्फे चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री मुंबई यांना निवेदन देण्यात आले.

ब्रम्हपुरी तालुक्यात नागरिकांना ऑनलाइन शासकीय सुविधा मिळवून देण्यासाठी ही सेवा केंद्रे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. डिजिटल माध्यमातून नागरिकांचा वेळ, श्रम आणि खर्च याची बचत होत असून, हजारो युवकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तरीही शासनाकडून या केंद्र चालकांप्रती सापत्नभावाची वागणूक दिली जात असल्याचा आरोप निवेदनातून केला. वारंवार बदलणारी परिपत्रके आणि नव्या 'आपले सरकार सेवा केंद्र' संदर्भातील संभ्रमाने केंद्र चालक त्रस्तझाले असल्याचे नमूद करण्यात आले.

शासन निर्णयातील विसंगती दूर करून परिपत्रकात फेरबदल करावेत, नवीन केंद्रांना मनमानी परवानग्या देऊ नयेत, तसेच आधार सेवा केंद्रांचे प्रलंबित कमिशन त्वरित द्यावे, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या. निवेदन देताना चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष पवन जयस्वाल ब्रम्हपुरी, उपाध्यक्ष पराग राऊत, सचिव केशव पाटील तालुका सेतू संचालक आदी उपस्थित होते.

# डॉ. मोहन कापगते लिखित पुस्तक गोंडवाना विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

## श्री तुकारामदादा गीताचार्य : जीवन आणि कार्य पुस्तकाचे विमोचन






ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रम्हपुरी येथील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. मोहन कापगते लिखित 'श्री तुकारामदादा गीताचार्य : जीवन आणि कार्य' हे पुस्तक गोंडवाना विद्यापीठात एम. ए. इतिहास या विषयासाठी अभ्यासक्रमात संदर्भग्रंथ म्हणून लावण्यात आले आहे. सदर पुस्तकाचे प्रकाशन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारकृती संमेलनात महाराष्ट्र राज्याचे माजी सांस्कृतिक मंत्री मा. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले होते.

लेखकाने सदर पुस्तकात कर्मयोगी तुकारामदादा गीताचार्य यांच्यावर संशोधन करून त्यांचे कार्य समाजासमोर मांडले आहे. आधुनिक विदर्भाच्या इतिहासातील अभ्यासक्रमात विदर्भातील सामाजिक चळवळीच्या संदर्भात गुरुदेव सेवा मंडळ व तुकारामदादांचे सामाजिक कार्य महत्त्वपूर्ण आहे. या पुस्तकाच्या अभ्यासक्रमातील समावेशामुळे इतिहासातील मान्यवर मंडळी व विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त करून लेखकाचे अभिनंदन केले आहे.

❁❁❁❁❁❁❁

# सावंगीच्या विनय बुल्लेची राज्य संघात निवड

देसाईगंज/प्रतिनिधी



विनय प्रभाकर बुल्ले हा मूळचा गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज तालुक्यातील सावंगी या गावाचा रहिवासी आहे. विनय चे वडील प्रभाकर बुल्ले हे शासकीय तांत्रिक विद्यालय गडचिरोली (आयटीआय) येथे मुख्य लिपिक पदावर कार्यरत असल्यामुळे गडचिरोली येथे त्यांचे कुटुंबीय सद्यस्थित वास्तव्यास आहेत. विनय ला लहानपणापासूनच व्हॉलीबॉल खेळाची आवड असल्यामुळे, त्यांनी त्याला प्रोत्साहन दिले. जिल्हा क्रीडा प्रशिक्षण संघ गडचिरोली येथे विनयने या खेळाचे प्रशिक्षण घेतले. विनयने जिद्द, चिकाटी आणि मेहनतीने व्हॉलीबॉल खेळाचा सराव नेहमीच चालू ठेवला. शासकीय तसेच खाजगी भरविल्या जाणाऱ्या हॉलीबॉल स्पर्धेत आपल्या चमुशी हिरीरीने सहभागी होत अनेक खेळ जिंकले. व्हॉलीबॉल स्पर्धेत विनय लिफ्टर म्हणून आपली भूमिका प्रभावीपणे बजावतो. गडचिरोली येथे पार पडलेल्या विभाग स्तरीय (विभागीय) व्हॉलीबॉल स्पर्धेत लिफ्टर म्हणून अंडर १९ गटात त्याची निवड झाली. तद्नंतर गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथील तालुका क्रीडा संकुल येथे दिनांक ०३ व ०४ नोव्हेंबर २०२५ ला पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत त्याची सलग दोन दिवस चाचणी घेण्यात आली. त्यात त्याने १९ वर्षाखालील व्हॉलीबॉल स्पर्धेत लिफ्टर म्हणून चांगली कामगिरी बजावली. त्यामुळे राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेकरिता महाराष्ट्र राज्य संघात त्याची निवड करण्यात आली. मध्य प्रदेश गदर वाडा येथे दिनांक १३ ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेकरता विनय महाराष्ट्र राज्य संघात लिफ्टर म्हणून खेळणार आहे. यासाठी विनय बुल्ले हा अकोला येथे व्हॉलीबॉल स्पर्धेची पूर्वतयारी करण्याकरिता कॅम्पला जाणार आहे.

विनय बुल्ले याची राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेकरीता महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल जिल्हा क्रीडा प्रशिक्षण संघ गडचिरोली, स्पंदन फाउंडेशन गडचिरोली, विद्याभारती जुनिअर कॉलेज आंबेशिवनी, जिल्हा गडचिरोली, माधवजी बुल्ले गुरुजी, वडील प्रभाकर बुल्ले, बुल्ले कुटुंबीय सावंगी यांनी अभिनंदन केले आहे.

# ब्रम्हपुरीतील भाऊ-बहिणीची आंतरराष्ट्रीय स्तरावर दमदार कामगिरी

## जर्मनीतील विश्व कराटे स्पर्धेत पटकाविले कांस्य पदक

ब्रम्हपुरी/का.प्र.

२६ ऑक्टोंबर ते ०१ नोव्हेंबर २०२५ दरम्यान जर्मनी देशातील ट्रायर या ठिकाणी संपन्न झालेल्या विश्व कराटे स्पर्धेत ब्रम्हपूरी येथील दोघे भाऊ बहीण देखील सहभागी झाले होते. या स्पर्धेत दोघांनी आपल्या कौशल्याची झलक दाखवत कराटे स्पर्धेत कांस्य पदक पटकावून देशाचे नावलौकिक केले आहे.



ब्रम्हपूरी शहरातील महालक्ष्मी नगर येथील रहिवासी असलेले ऋषिकेश पितेवश्वर येरमे व विजयालक्ष्मी पितेश्वर येरमे या भाऊबहीणीला सुरवातीपासूनच कराटे बद्दल आकर्षण असल्याने लहानपणापासून त्यांनी कराटेचा सराव केला. त्यानंतर ते स्थानिक स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरावरील अनेक स्पर्धांमध्ये सहभागी झाले. त्यात त्यांना यश देखील मिळाले होते. त्यानंतर आता जर्मनी देशात आयोजित करण्यात आलेल्या विश्व कराटे स्पर्धेत सहभागी झाले. या स्पर्धेत जगभरातील कराटे चॅम्पियन सहभागी झाले होते. यामध्ये ह्या ब्रम्हपूरीतील बहीण भावाच्या जोडीने दमदार कामगिरी पार पडत कांस्य पदक पटकावले आहे.

त्याबद्दल त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन ब्रम्हपूरीचे नाव साता समुद्रपार पोहचवून आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक केल्याबद्दल राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा विधिमंडळ पक्षनेते आम. विजय वडेट्टीवार यांच्या मतदार संघातील या कौशल्यवाण भाऊबहिणीचा आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या सूचनेनुसार जनसंपर्क कार्यालयाचे प्रमुख सुधीर पंदीलवार, शहर कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष लक्ष्मण जिभकाटे, युवक कॉंग्रेसचे शहर उपाध्यक्ष मयूर मेश्राम, चंद्रकांत जिभकाटे, सुरेश वंजारी यांनी सत्कार केला आहे.

# आपणही समाजाचं देणं लागतो, या भावनेने समाजऋण फेडणे आवश्यक - आमदार बंटी भांगडिया

ब्रम्हपुरी/का.प्र.

समाजात जगत असतांना, अनेक जण आपल्याला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य करीत असतात. लोकांनी केलेल्या मदतीची जाण असणे आवश्यक आहे. परंतु हल्लीच्या स्वार्थी काळात लोक केलेल्या मदतीची जाण ठेवत नाही. परंतु काही लोक याला अपवाद ठरत आहेत. जीवन जगत असतांना, ज्यांनी आपणास प्रत्यक्ष मदत केली, त्या मदतीची आठवण ठेवत त्याचे प्रत्येकाने समाजऋण फेडणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी उर्फ कीर्तीकुमार भांगडिया यांनी केले. ते पिंपळगाव (खरकाडा ) येथे आयोजित कार्तिक पौर्णिमा निमित्ताने गोपालकाला तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



पुण्यतिथी निमित्त जाहीर कीर्तन, सत्कार समारंभ कार्यक्रम प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

पिंपळगाव (खरकाडा) येथे कार्तिक पोर्णिमे निमित्त गोपालकाला, जाहीर कीर्तन तथा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी चिमुर विधानसभा क्षेत्राचे आमदार किर्तिकुमार भागडिंया, उद्योजक दिपक उराडे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष क्रिष्णा सहारे, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रेमलाल धोटे, माजी नगरसेवक विलास विखार, भाजपा नेते आवेश पठाण, सुरेश दर्वे आदी. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण व अभिवादन करून झाली.

यावेळी समितीचे आयोजक नानाजी तुपट यांनी आमदार बंटी भांगडिया यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. प्रसंगी चिमुर विधानसभा क्षेत्राचे आमदार किर्तिकुमार भागडिंया यांच्या हस्ते उपस्थित सत्कारमुर्ती कवडूजी तुपट, धुरपताबाई तुपट, बळीराम राऊत, माजी सरपंच मुखरु पारधी, यादवराव उरकुडे, माजी सरपंच मुखरु ठाकरे, उद्योजक दिपक उराडे, उत्तम बगमारे याचा सत्कार करण्यात आला.

पुढे बोलतांना आमदार किर्तिकुमार भागडिंया यांनी म्हटले की, हल्लीच्या काळात भावा–भावांमध्ये पूर्वीसारखे प्रेमसंबध टिकून राहीले नाही. परंतु आजच्या कार्यक्रमात नानाजी तुपट यांचे भावा–भावातील प्रेमसंबध किती दृढ आहेत, हे दिसून आले. पडत्या काळात कुटूंब स्थिर होण्यासाठी ज्यांनी तुपट परिवाराला मदत केली, त्यांचे समाजऋण फेडण्याचा हा देखणा सोहळा अनुभवण्यासाठी उपस्थित असल्याचे सांगितले. प्रसंगी कार्तिक पौर्णिमा निमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमला शुभेच्छा दिल्या. वर्षानुवर्षे चालू असलेल्या या पारंपरिक कार्यक्रमाला ८१ वर्षे लोटली असून ही प्रथा गावकऱ्या करीता कौतुकास्पद असून सामाजिक एकोपाचे दर्शन घडत असल्याचे सांगितले.

या प्रसंगी किर्तकार ह.भ.प. सौ.मस्केताई यांनी आपल्या किर्तनातुन सामाजिक जनजागृती करित लोकाची मने जिंकली. सत्काळ सोहळयानंतर गोपालकाला व महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी पिंपळगांव खरकाडा येथील असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पैशाच्या श्रीमंतीपेक्षा विचारांच्या श्रीमंतीने माणूस मोठा होतो

### डॉ. धनराज खानोरकर : प्रेरणा महाविद्यालयात कार्यक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

'माणूस घडण्यासाठी योग्य संस्काराची गरज असते.



केस वाढवून देवानंद होण्यापेक्षा ज्ञान वाढवून विवेकानंद होणे केव्हाही चांगले असते. पैसाच्या श्रीमंतीपेक्षा विचाराच्या श्रीमंतीने माणूस खूप मोठा होतो ' असे मार्मिक भाष्य ३३ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष कवी, लेखक डॉ धनराज खानोरकरांनी केले. ते गडचांदूर येथील प्रेरणा प्रशासकीय महाविद्यालयात सत्कार कार्यक्रमात बोलत होते.

विचारपीठावर संस्थासचिव डॉ राजकुमार मुसणे, प्राचार्य प्रवीण आंबटकर, प्रा इजाज शेख, प्रा.कुबंलकर मॅडम, कुंजन शेंडे विचार पिठावर उपस्थित होते. याप्रसंगी पाहूण्यांच्या हस्ते डॉ खानोरकरांचा शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ राजकुमार मुसणेंनी, 'डॉ धनराज खानोरकर हे प्रेरणादायी व्यक्तित्व असून ते चौफेर लेखन करीत आहेत. विविध क्षेत्रात त्यांचा वावर असून प्रंचड ताकदीने हा माणूस पुढे आलेला आहे. विद्यार्थीनी त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे विचार व्यक्त केले.

प्रास्ताविक प्राचार्य आंबटकर तर संचालन व आभार प्रदर्शन प्रा कुबंलकर मॅडम यांनी केले.

# ने.हि. महाविद्यालयात मौलाना अब्दुल कलाम आझाद जयंती

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात मौलाना अब्दुल कलाम आझाद जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या जयंती कार्यक्रमात प्राचार्यांच्या कक्षासमोर मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेचे पूजन करुन प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी व अधीक्षक संगीता ठाकरे यांनी प्रतिमेला माल्यार्पण केले.यानंतर जयघोष



करण्यात आला.याप्रसंगी पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर, प्रा ठोंबरे, प्रा अजय खोब्रागडे, शशिकांत माडे, रुपेश चामलाटे, प्रज्ञा मेश्राम इत्यादी मान्यवरांनी पुष्प वाहून अभिवादन केले. यशस्वीतेसाठी समिति सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# न.प. निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र सादर करण्याची मुदत १७ नोव्हेंबरपर्यंत

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगर परिषद ब्रम्हपुरी सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता दिनांक १०/११/२०२५ ते दिनांक १७/११/२०२५ चे सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजता पर्यंत उमेदवारांना नामनिर्देशन पत्र ऑनलाईन स्वरूपात दाखल करावयाचे आहेत.

सदर नामनिर्देशन पत्र राज्य निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ https:// mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर किंवा https://mahasecelec.in/ या लिंक वरून उपलब्ध असलेल्या 'create a candidate registration form' या शिर्षकाखाली पूर्ण माहिती भरून उमेदवाराची स्वाक्षरी असलेले प्रिंट निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करता येईल. सदर नाम निर्देशन पत्र सादर करताना काही अडचणी किंवा शंका असल्यास नगर परिषद ब्रम्हपुरी अंतर्गत नाम निर्देशन पत्र मदत कक्षाची' स्थापना करण्यात आलेली आहे.

अधिक माहितीकरीता मंगेश बोंद्रे, नोडल अधिकारी, नामनिर्देशन मदत कक्ष (मो.क्र. ८१४९४५०४५२) यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन सतीश मासाळ, निवडणूक निर्णय अधिकारी, नगर परिषद ब्रम्हपुरी सार्वत्रिक निवडणूक २०२५ तथा तहसीलदार, ब्रम्हपुरी यांनी केले आहे.

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# वाघाच्या हल्ल्यात इसम ठार



मृतक
भास्कर गजभिये



ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील मेंडकी येथील रहिवाशी भास्कर गजभिये हा इसम मेंडकी लागत असलेल्या जवराबोडी मेंढा या जंगल शिवारात सिंदी आणण्यासाठी वनपरिक्षेत्र उत्तर ब्रम्हपुरी उपक्षेत्र मेंडकी नियतक्षेत्र मेंडकी येथील जंगला लगत गट क्रमांक ३० खाजगी शेतामध्ये दिनांक ०९ नोव्हेंबरला भाष्कर गोविंदा गजभिये रा. मेंडकी वय वर्षे ६५ हे सिंधी तोडण्याकरीता गेले असता त्यांचेवर दुपारी ०४.०० च्या सुमारास बाघाने हल्ला करुन ठार केले.

दुसऱ्या दिवशी सोमवारला गावातील नागरिकांनी शोध घेतला असता इसमाच्या मृतदेहाचे तुकडे जागोजागी आढळून आले. वाघाने मृतकाच्या शरीराचे तुकडे तुकडे केले होते.

सदची घटना प्राप्त होताच वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तर ब्रम्हपुरी नरड साहेब व अधिनिस्त कर्मचारी यांनी मौका स्थळी जाऊन चौकशी केली असता सदरची घटना वाघाचे हल्ल्यात झाल्याचे आढळून आले.

घटनास्थळी पंचनामा नोंद करुन शव उत्तरणीय तपासणी करीता ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी येथे आणण्यात आले. मौका स्थळी ५ कॅमेरा ट्रॅप व लाईव्ह कॅमेरे लावण्यात आलेले आहे तसेच मानव व वन्यजीव संघर्ष उद्‌भवू नये याकरीता क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना तैनात करण्यात आले आहे.

# १ लाख ६६ हजारांची विदेशी दारूसह एकास अटक

## अवैध दारू वाहतूक प्रकरण

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनचे शोध पथक ०६ नोव्हेंबरला पोस्टे हद्दीत गस्त करत असताना, त्यांना रीट्झ कंपनीची




कार क्रमांक एम एस २० बी.सी. ८१६१ असलेल्या गाडीमध्ये अवैधरित्या विदेशी दारू घेऊन आवळगाव कडून गांगलवाडी मार्गे ब्रह्मपुरी शहराकडे येणार असल्याची माहिती मिळाल्याने, नाकाबंदी करून वाहन तपासणी केली असता रिट्झ कंपनीची वाहन क्रमांक एम एच २० बी.सी. ८१६१ असलेल्या कारची झडती घेतली असता त्यामध्ये विदेशी दारू आढळून आली.

त्यामध्ये इम्पेरियल ब्ल्यू ९० एम एलचे ५०० नग बॉटल किंमत ६०,०००/- रुपये, रॉयल स्टॅग कंपनीच्या १८० एम एलच्या एकूण २२६ नग बॉटल किंमत ५२,८००/- रुपये व मॅकडॉनल्ड्स कंपनीच्या १८० एम एलच्या एकूण २४० नग बॉटल किंमत ६०,०००/- रुपये असा १,६६,०००/- रुपये किमतीचा विदेशी दारूचा साठा व एम एच २० बी.सी. ८१६१ क्रमांक असलेली मारुती सुझुकी रिट्स कंपनीची कार किंमत ३,००,०००/- रुपये असा एकूण ४,६६,८००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे गणेश बाळकृष्ण कुथे वय ३५ वर्ष रा.उदापूर ता.ब्रह्मपुरी याला ताब्यात घेत त्याचे विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर कारवाई मा .पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का, सा. अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी राकेश जाधव, पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनात सहा. पोनि मनोज खडसे, पोहवा योगेश शिवणकर, पो हवा अजय कटाईत , पोना मुकेश गजबे, पोशी स्वप्निल पळसपगार, चंदू कुलसंगे, इरशाद खान, निलेश तुमसरे यांनी केली.

झाडे लावा, झाडे जगवा...

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता

www.bramhapuri samachar.com/bs

या ऑनलाईन साईटला भेट द्या बातम्यांकरीता संपर्क :

मो. 9503100964
मो. 8275715315

... QUOTES ...

"Success today requires the agility and drive to constantly rethink, reinvigorate, react and reinvent."

- Bill Gates

चा रो ळी

आरशातले तुझे प्रतिबिंब पाहून
आकाशातले, चंद्रबिंब विचारे लाजले...
त्याचे वाढणे कलेकलेने, तुझे किलोकिलोने,
'एका वेळेस एकच चंद्र' वजनयंत्र म्हणाले...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# विद्यापीठाच्या भोंगळ कारभारविरोधात महाविद्यालय बंद आंदोलन

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोंडवाना विद्यापीठाच्या निष्काळजीपणा व भोंगड कारभारामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या विविध प्रकारचे समस्यामुळे गोंडवाना विद्यापीठाचा तीव्र निषेध करत ८ नोव्हेंबर २०२५ ला गोंडवाना विद्यापिठाला सलग्न असलेल्या विविध महाविद्यालयावरती महाविद्यालय बंद आंदोलन पुकारण्यात आला यात अभावीप चे कार्यकर्त्यांनी निवेदन देत



ब्रम्हपुरी नगरातील विविध कॉलेजेस व इतरही तालुक्यातील महाविद्यालयांवर निवेदन देऊन महाविद्यालय बंद करण्यात आले.

या आंदोलनानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद इथेच थांबणार नाही तर ( प्रवेश, परीक्षा, परिणाम, पाठ्यक्रम, पदभरती, छात्र संघ निवडणूक) या विषयांना घेऊन व इतर विषयांना घेऊन गोंडवाना विद्यापीठावर मोठ्या संख्येत धडक मोर्चा करणार आहे. व विद्यार्थ्यांचा हक्क हा विद्यार्थ्यांना मिळवून देण्याचा काम हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद करणार आहे. विद्यार्थ्यांनी एकजूट होऊन या धडक मोर्चा मध्ये सहभागी व्हावे, विद्यापीठाला दाखवून द्या की विद्यार्थी हा कमजोर नाही, असे आवाहन अभाविपद्वारे करण्यात आले.

ब्रम्हपुरी येथील कॉलेज बंद आंदोलनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ब्रम्हपुरी नगरमंत्री कल्याणी मानगुडे, नगर सहमंत्री सचिन नंदनवार जिल्हा सह संयोजक सविता सरकार भाग संयोजक अंकित मेश्राम व अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

✻✻✻✻✻✻

# जिल्हा परिषद चंद्रपूरच्या उपक्रमात लावण्या खानोरकर विद्यार्थीनीची दखल


## "परंपरा जपणारे कुर्झा" लेख प्रकाशित

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी पंचायत समिति अंतर्गत कुर्झा वार्ड, ब्रह्मपुरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुर्झा शाळेतील वर्ग चवथे वर्गातील मागील सत्र २०२३-२४ ची विद्यार्थिनी कु. लावण्या भास्कर खानोरकर हिने चंद्रपूर जिल्हा परिषद 'माझा गाव माझा इतिहास' उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

सदर विद्यार्थिनीने आपल्या गावावर 'परंपरा जपणारे कुर्झा ' हा लेख लिहला. या लेखाची दखल जिल्हा उपक्रमात घेण्यात आली असून सदर लेख चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत निघणाऱ्या पुस्तकात प्रकाशित करण्यात आला आहे. याबद्दल शाळेतील शिक्षक हरिदास गोंगले सर, वंजारी सर व शाळा समिती, डॉ धनराज खानोरकर, वार्डातील नागरिकांनी तिचे अभिनंदन केले आहे.

या सत्रात कु.लावण्या भास्कर खानोरकर ही ब्रह्मपुरीच्या नेवजाबाई हितकारिणी कन्या शाळेत वर्ग ५ व्या वर्गात शिकत असून तिच्या या यशाचे कौतुकही मुख्याध्यापक बनपुरकर मॅडम व शिक्षकांनीही केले आहे.


परंपरा जपणारे कुर्झा

माझे गाव कुर्झा, वैनगंगा नदीच्या सुंदर खोऱ्यात वसलेले आहे. हे गाव ब्रम्हपुरी शहरापासून फक्त दोन किलोमीटर अंतरावर आहे. पूर्वी हे एक छोटे, निसर्गरम्य खेडे होते. मोहाच्या झाडांनी वेढलेले, हिरवाईने नटलेले हे गाव खूप सुंदर दिसायचे. पण जसजशी लोकसंख्या वाढत गेली, तसतशी वृक्षतोड वाढली. आज हे गाव ब्रम्हपुरीचा एक भाग बनले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात कुर्झा एक साधे गाव होते. तेली समाज इथे मोठ्या संख्येने होता आणि त्यांचा तेल काढण्याचा पारंपरिक व्यवसाय होता. कुणबी लोक शेती करत, तर लोहार समाज शेतीची औजारे बनवत. गावातले सगळेच लोक एकमेकांवर अवलंबून होते. एक प्रकारे व्यवस्था नैसर्गिक आणि सोपी होती.

कुर्झा गावात आजही भजन मंडळे, दंडार, नाट्यमंडळे यांसारखी पारंपरिक मनोरंजनाची साधने जिवंत आहेत. रोवणीची गाणी, लग्नातली पारंपरिक गाणी अजूनही गावात गुणगुणली जातात.

इथल्या लोकांचे राहणीमान खूप साधे आहे. शेतीवर उपजीविका करणारे हे लोक दूध आणि दह्याचा व्यवसाय करून शहराला पुरवठा करतात. आजही अनेकांच्या घरात गाय, म्हशी पाळल्या जातात.

गावात एक पुरातन हनुमान मंदिर आहे आणि माराईमातेचेही एक मंदिर आहे. दरवर्षी भागवत सप्ताहाचे आयोजन केले जाते. हा कार्यक्रम गेल्या १५० वर्षांपासून चालू आहे. या कार्यक्रमात संपूर्ण गाव एकत्र येते.

परंपरा जपणारे हे माझे गाव हाच माझा इतिहास आहे.

लावण्या भास्कर खानोरकर









## इंजि. विजय मेश्राम यांची प्रदेश सरचिटणिस पदी नियुक्ती



ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांतजी शिंदे यांनी इंजि. विजय मेश्राम सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता महावितरण महाराष्ट्र राज्य यांची प्रदेशाचे सरचिटणीस पदावर तर माजी उपसभापती तथा सदस्य पंचायत समिति तुमसर हिरालालजी नागपुरे यांची सचिव पदावर नियुक्ती करून जिल्ह्यातील पदाधिकारी यांना सामावून घेत सन्मान केला.

भंडाराचे माजी आमदार चरण वाघमारे यांचेसह त्यांच्या मित्रवर्गांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

जल है तो कल है...

## न.प. निवडणूक...

(पान क्र. ९ वरून)

आदी. कामे माजी नगरसेवक विलास विखार यांच्या नेतृत्वाखाली होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात केली जात आहे. एकंदरीत लोक चर्चेवरून माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांची पक्षवाढी संदर्भातील कारकिर्दी आता नवप्रवेशित माजी नगरसेवक विलास विखार यांच्या हातात जाण्याची चिन्हे दिसून येत आहेत. पक्षश्रेष्ठी कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्यांचा कार्यकारी अभियंता गोसेखुर्द कालवा यांना घेराव

# उन्हाळी व हिवाळी पिकासाठी गोसेखुर्दचे पाणी द्या



ब्रम्हपुरी/का.प्र.

सन २०२५-२६ या उन्हाळी धान पिकासाठी विभागाच्या कालव्याचे गोसेखुर्द उजवा कालवा विभागात येणाऱ्या ५६ पाणी वापर संस्थेतील संपूर्ण क्षेत्रा करिता सन २०२५ ते २०२६ या उन्हाळी हंगामाकरिता धरणाचे पाणी मिळणार की नाही असे लेखी स्वरूपात सर्व पाणी वापर संस्थेला कळवावे अशी विनंती केली होती. मात्र संबंधितांकडून मुख्य धरणा पासून फक्त २२ किलो मीटर पर्यंत पाणी देऊ असे पत्र मिळाल्याने ब्रम्हपुरी विभागातील सर्व ५६ पाणी वाटप संस्था अंतर्गत येणाऱ्या सर्व गावातील शेतकरी या उजव्या कालव्याच्या पाण्या पासून वंचित राहणार आहेत.

शेवटी अभियंता हासे यांनी वरिष्ठ अधिकारी मा.पाटील अधीक्षक अभियंता यांच्या सोबत भ्रमणध्वनी द्वारे शेतकऱ्यांशी चर्चा घडवून आणली आणि यावर तोडगा काढण्यासाठी येणाऱ्या १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता ब्रम्हपुरी येथील गोसेखुर्द धरण प्रकल्प कार्यालयात शेतकऱ्यांना सोबत बैठक घेण्याचे लेखी पत्र दिल्याने तात्पुरते घेराव आंदोलन मागे घेण्यात आले आहे आणि येणाऱ्या गुरुवारी पाणी सोडण्याचे योग्य निर्णय न झाल्यास गोसेखुर्द कार्यालयाला ताला ठोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदन देताना विनोद झोडगे, रामलाल दोनाडकर, योगेश्वर ठाकरे, लोमेश मेश्राम, ईश्वर ठाकरे, प्रतीक डांगे, बालू नवघडे, भैय्या पाल, दतू नागोसे, आदर्श रामटेके, अनिल गोटफोडे, केशव वसाके, घनश्याम ऊइके, फुलचंद शेंडे, त्रिलोक बागमारे, जीवन टेंभुर्णे, सुधीर बेदरे, धनराज सातपुते, बाबा गणवीर, बाळकृष्ण नागोसे, भाऊराव ठाकरे आदी शेतकरी उपस्थित होते.

❇❇❇❇❇❇

## काँग्रेसकडून नगराध्यक्ष पदासाठी...

(पान क्र. ९ वरून)

खेमराज तिडके यांनी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांच्या नावाची जाहीर घोषणा केली. तसेच उर्वरित नगरसेवक पदाच्या उमेदवारांची निश्चीत यादी जाहीर करण्यात आली. यात एकुण २३ उमेदवारपैकी २२ निश्चीत उमेदवारांची घोषणा काँग्रेस पक्षाने केली आहे.

यात प्रभाग क्रमांक १ (अ) काजल राजेश तलमले, (ब) चंद्रकांत ज्ञानेश्वर बावणकुळे,प्रभाग क्रमांक २ (अ) बबीता किशोर आमले (ब ) प्रकाश शामराव खोब्रागडे,प्रभाग क्रमांक ३ (अ) मनोज कावळे, (ब) रेणूताई राहुल ठेंगरी,प्रभाग क्रमांक ४ (अ) डॉ. प्रेमलाल मेश्राम (वंचित बहुजन आघाडी), (ब) तनुजा विजय राऊत, प्रभाग क्रमांक ५ (अ) सतिश हुमने, (ब) रंजना नंदू पिसे, प्रभाग क्रमांक ०६ (अ) लता सिंहगडे (वंचित), (ब) मोंटू पिलारे, प्रभाग क्रमांक ७ (ब) अमोल वामनराव भानारकर, प्रभाग क्रमांक ८ (अ) पुष्पलता सुधाकर पोपटे, ( ब ) नितीन जनार्दन उराडे, प्रभाग क्रमांक ९ (अ) अनिल दोनाडकर, (ब) सपना संजय बल्लारपूरे, प्रभाग क्रमांक १० (अ) राकेश पडोळे, (ब) ज्योती राऊत, प्रभाग क्रमांक ११ (अ) माधुरी सोमेश्वर उपासे, (ब) रंजना बुराडे, ( क ) हार्दिक किशोर रत्नपारखी यांचा समावेश आहे. उर्वरीत ०१ नाव लवकरच जाहीर होणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष खेमराज तिडके यांनी सोशल मीडियाद्वारे दिली.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404